Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक ३ ]  गुरुवार, एप्रिल १६, २०२६/चैत्र २६, शके १९४८  [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

**संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश**

भाग १ (असा.) (अ.वि.पु.). म.शा.रा., अ. क्र. १०.

**प्रभारी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९ ची घोषणा**

क्रमांक-शिरस्तेदार-भूसंपादन-कलम-१९-कावि-३१९-२०२६.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात पुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून अधिसूचना, क्रमांक शिरस्तेदार-भू.सं-कलम-११-कावि-९२१-२०२५, दिनांक  १६ सप्टेंबर, २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमीनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनीर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्याची खात्री पटली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि म्हणून त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मोर्शी यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची—एक

### जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०३-४७-२०२४-२०२५, मौजा सहादापुर, ता. मोर्शी, जिल्हा अमरावती.

| अ. क्र. | चालता क्र. | गट नं./स.नं. | एकूण क्षेत्र | संपादित करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | हे. आर | हे. आर |
| १ | १ | १७/१ | १ ९८ | १ ९८ |
| २ | २ | १७/१अ | १ ९९ | १ ९९ |
| ३ | ३ | १७/२ | १ ४१ | १ ४१ |
| ४ | ४ | १७/३ | १ ४१ | १ ४१ |
| ५ | ५ | १७/४ | १ ३९ | १ ३९ |
| ६ | ६ | १७/५ | १ ६२ | १ ६२ |
| ७ | ७ | १७/६ | १ ६२ | १ ६२ |
| ८ | ८ | १६/५ पै. | ० ८१ | ० ८१ |
| ९ | ९ | १६/५ पै. | ० ८१ | ० ८१ |
| १० | १० | १६/४ | १ ०१ | १ ०१ |
| ११ | ११ | १६/३ | १ ०१ | १ ०१ |
| १२ | १२ | १६/१ | २ ०२ | २ ०२ |
| १३ | १३ | १६/२ | १ १५ | १ १५ |
| १४ | १४ | १६/३ | ३ ५८ | ३ ५८ |

## अनुसूची—दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :— | मराठी भाषा विद्यापीठ. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :— | मराठी भाषा विद्यापीठाचे कामाकरीता. |
| भूसंपादन प्रकरण क्रमांक | :— | ०३-४७-२०२४-२५, मौजा सहादापुर, ता, मोर्शी. |
| समाजाला मिळणारे लाभ | :— | या प्रकल्पाव्दारे शैक्षणिक फायदा होणार असून क्षेत्रातील विद्यार्थ्याचा शैक्षणिक विकास होणार आहे. |

## अनुसूची—तीन

### बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहीती - निरंक -

## अनुसूची—चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश : महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ अ, दिनांक १३ मार्च, २०१५ उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ मधील तरतुदी लागू करण्यापासून सूट प्राप्त.

## अनुसूची—पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम | : | आवश्यकता नाही, सबब माहीती – निरंक – |
| (ब) | प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता | : | – निरंक – |
| (क) | ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे, त्या अधिसूचनेचा तपशील | : | – निरंक – |

**टीप :-** उक्त जमिनीच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मोर्शी या कार्यालयात निरीक्षण करता येऊ शकेल.

**सागर ढवळे,**
प्रभारी उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी, मोर्शी.

मोर्शी :
दिनांक १० एप्रिल, २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.